नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

दैनिक

# यश सिद्धि न्यूज

YASH SIDDHI NEWS

संपादक : कमलाकर सोनकांबळे

वर्ष - २ रे Year - 2nd | अंक - १६१ Issue - 161 | वार रविवार दि. २७ ऑक्टोबर २०२४ Blow- Sunday Date 27 October 2024 | ई-पेपर - https://epaper. yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@ gmail.com

## दाना चक्रीवादळाने ओडिशात १.७५ लाख एकर पिकांचे नुकसान



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ओडिसा/नवी दिल्ली : दाना चक्रीवादळ आणि त्यामुळे आलेल्या मुसळधार पावसामुळे ओडिशातील १.७५ लाख एकर जमिनीवरील उभ्या पिकांचे नुकसान झाल्याचे,

### अहवालाअंती सरकार शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा निर्णय घेईल : मुख्यमंत्री मोहन चरण माझी

तसेच २.८० लाख एकर जमिनीवरील पिके बुडिताखाली गेल्याचा प्राथमिक अंदाज असल्याचे कृषी आणि शेतकरी सक्षमीकरण विभागाचे प्रधान सचिव अरबिंदा पाधी यांनी शनिवारी आपल्या एक्स संदेशात म्हटले आहे. तसेच राज्य सरकारने कृषी आणि महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांना चक्रीवादळामुळे झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याचे निर्देश दिल्याची माहिती त्यांनी दिली. अहवालाअंती सरकार शेतकऱ्यांच्या नुकसानभरपाईचा निर्णय घेईल असे मुख्यमंत्री मोहन चरण माझी यांनी सांगितले.

ओडिशाच्या बालासोर जिल्ह्याचा दक्षिणेकडील भाग खैरा, सिमुलिया, बहनगा, सोरो, औपाडा आणि निलागिरी या भागांना त्याचा सर्वाधिक फटका बसल्याचे जिल्हाधिकारी सूर्यबंसी मयूर विकास यांनी सांगितले. येथील सुमारे ४० हजार घरांचा वीजपुरवठा खंडित करण्यात आला. राज्याचे महसूल आणि आपत्ती व्यवस्थापन मंत्री सुरेश पुजारी यांनी परिस्थितीवर लक्ष ठेवून असल्याचे म्हटले आहे.

## सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीची उधळपट्टी, दुरुपयोग रोखण्यासाठी समिती स्थापन करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या सरकारी जाहिरातींसाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर केला जात असल्याच्या जनहित याचिकेची उच्च न्यायालयाने दखल घेतली. तसेच, हा गैरवापर टाळण्यासाठी तीन सदस्यीय समिती स्थापन करण्याचे आदेश राज्य सरकारला दिले.

समितीची पुनर्रचना करून ती पुन्हा सक्रिय करण्याचेही आदेश न्यायमूर्ती महेश सोनक आणि न्यायमूर्ती जितेंद्र जैन यांच्या खंडपीठाने राज्याच्या मुख्य सचिवांना दिले. यापूर्वी, २०१५ मध्ये त्रिसदस्यीय समितीच्या स्थापनेचे आदेश देण्यात आले होते. त्याचा एप्रिल २०१६ मध्येही पुनरुच्चार करण्यात

### उच्च न्यायालयाचे राज्य सरकारला आदेश

आला होता. त्यामुळे, राज्य सरकारने लवकरात लवकर या त्रिसदस्यीय समितीची स्थापना करावी, असे खंडपीठाने आदेशात प्रामुख्याने नमूद केले आहे.

वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांत प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातींच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन होत असल्याचा दावा करणारी याचिका एडिटर्स फोरमने दाखल केली होती. त्याचप्रमाणे, माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालय (डीजीआयपीआर), इतर सरकारी संस्था आणि स्थानिक प्राधिकरणांमार्फत होणाऱ्या अनियमिततेबाबत चौकशी करण्यासाठी आयोग स्थापन करण्याची मागणीही केली होती. त्यावरील सुनावणीच्या वेळी न्यायालयाने उपरोक्त आदेश दिले.



सत्ताधारी पक्ष आपला जाहीरनामा सरकारी प्राधिकरणांमार्फत वृत्तपत्रात अथवा इलेक्ट्रॉनिक माध्यमांमध्ये जाहिराती प्रसिद्ध करून करत असतात. तसेच, त्यासाठी सार्वजनिक निधीचा गैरवापर करत असल्याकडे सर्वोच्च न्यायालयाने यापूर्वीही लक्ष वेधले होते. त्यामुळे, सरकारकडून या गैरप्रकाराद्वारे भारतीय संविधानाच्या समानतेचा अधिकार आणि वैयक्तिक स्वातंत्र्यांचे उल्लंघन केले जात असल्याचे न्यायालयाने नमूद केले. त्यानंतर, राज्य सरकारने या समस्येवर लक्ष ठेवण्यासाठी एक समिती स्थापन केली होती. मात्र, करोनामुळे ही समिती कार्यान्वित झाली नाही, असे ताशेरेही न्यायालयाने आदेशात ओढले.

## राष्ट्रवादी शरद पवार पक्षाची दुसरी यादी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाने विधानसभा निवडणुकीसाठी आपली २२ उमेदवारांची दुसरी यादी जाहीर केली आहे. प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी आज मुंबईत पत्रकार परिषद घेऊन दुसरी यादी जाहीर केली. तिसरी यादी पत्रकार परिषद न घेता लवकरच जाहीर केली जाईल, असेही जयंत पाटील यांनी सांगितले. धाराशिव जिल्ह्यातील परांडा विधानसभा मतदारसंघात शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने आपला उमेदवार जाहीर केला होता. मात्र राष्ट्रवादीने आज परांडा येथे डॉ. तानाजी सावंत यांच्या विरोधात माजी आमदार राहुल मोटे यांचे नाव घोषित केले आहे. या मतदारसंघात उमेदवार दिल्यानंतर आता मविआमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. जयंत पाटील म्हणाले की, याबाबत आम्ही शिवसेनेशी चर्चा करू आणि वाद सोडविण्याचा प्रयत्न करू. भूम-परांडा या मतदारसंघात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाच्या राहुल मोटे यांनी २००४, २००९ आणि २०१४ साली असा सलग तीनवेला विजय मिळविला होता. मात्र २०१९ साली शिवसेनेच्या तानाजी सावंत यांनी त्यांचा पराभव केला. त्यामुळे शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाने याठिकाणी पहिल्याच यादीत राहुल पाटील यांना उमेदवारी जाहीर केली होती. यामुळे राहुल मोटे यांचे समर्थक नाराज होते. आज दुसरी यादी जाहीर करताना राष्ट्रवादीने राहुल मोटे यांना याठिकाणी उमेदवारी दिली आहे. जर ही चर्चा ठरवून झाली असेल तर परांडा विधानसभेत तानांजी सावंत विरुद्ध राष्ट्रवादी असा संघर्ष पुन्हा पाहायला मिळेल. मात्र शिवसेनेने याला मान्यता दिली नाही तर मात्र महाविकास आघाडीत बिघाडी होण्याची शक्यता आहे. तसेच या यादीत छगन भुजबळ यांच्या विरोधात माणिकराव शिंदे यांना उमेदवारी देण्यात आली आहे. माणिकराव शिंदे यांचा २००९ साली भुजबळ यांनी पराभव केला होता. तेव्हा ते शिवसेनेतून निवडणूक लढविली होती.



राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाची दुसरी यादी

१ एरंडोल सतीश अण्णा पाटील, २ गंगापूर सतीश चव्हाण, ३ शहापूर पांडुरंग बरोरा, ४ परांडा राहुल मोटे, ५ बीड संदीप क्षीरसागर, ६ आर्वी श्रीमती मयुरा काळे, ७ बागलान श्रीमती दीपिका चव्हाण, ८ येवला माणिकराव शिंदे, ९ सिन्नर उदय सांगळे, १० दिंडोरी श्रीमती सुनीताताई चारोस्कर, ११ नाशिक पूर्व गणेश गिते, १२ उल्हासनगर ओमी कलानी, १३ जुन्नर सत्यशील शेरकर, १४ पिंपरी श्रीमती सुलक्षणा शीलवंत, १५ खडकवासला सचिन दोडके, १६ पर्वती श्रीमती अश्विनीताई कदम, १७ अकोले अमित भांगरे, १८ अहिल्यानगर शहर अभिषेक कळमकर, १९ माळशिरस उत्तमराव जानकर, २० फलटण दीपक चव्हाण, २१ चंदगड श्रीमती नंदिनीताई भाबुळकर कुपेकर, २२ इचलकरंजी मदन कारंडे,

यावेळी जयंत पाटील म्हणाले की, लाडक्या बहिणींना निवडणुकीपुरतेच गोंरजण्याचे काम सुरू आहे. जयश्री थोरात यांच्याबद्दल संगणनेर येथे जे विधान करण्यात आले ते अत्यंत दुर्दैवी होते. लाडक्या बहिणींना कसे वागवले जाते, हे राज्याने पाहिले. कापूस आणि सोयाबिण पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास हिरावला. मात्र महायुतीच्या सरकारने शेतकऱ्यांना कोणतीही मदत केली नाही, आज दिवसाला दोन शेतकरी आत्महत्या करत आहेत.

## भाजपा उमेदवारांची दुसरी यादी जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : आगामी महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपाकडून उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली आहे. या यादीत एकूण २२ उमेदवारांचा समावेश करण्यात आला आहे. यापूर्वी पक्षाने जाहीर केलेल्या पहिल्या यादीत ९९ उमेदवारांचा समावेश होता. दोन्ही याद्या मिळून भाजपाने महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीसाठी आतापर्यंत १२१ उमेदवार जाहीर केले आहेत. आज भाजपाने जाहीर केलेल्या यादीत राम भदाणे यांना धुळे ग्रामीण मधून तर श्याम खोडे यांना वाशिम मतदारसंघातून उमेदवारी देण्यात आली आहे. सत्यजीत देशमुखांना शिराळा मतदारसंघातून विधानसभेच्या रिंगणात उतरवलं आहे.




त्याचबरोबर गोपीचंद पडळकरांना जत मतदारसंघातून उणेदवारी देण्यात आली आहे. यासह नाशिक मध्य या विधानसभा मतदारसंघावरून मोठी रस्सीखेच चालू होती, त्यावर भाजपाने तोडगा काढला आहे. पक्षाने देवयानी फरांदे यांना नाशिक मध्य या मतदारसंघातून विधानसभेचं तिकीट दिलं आहे. दुसऱ्या यादीतील सर्व २२ उमेदवारांची नावे :- १ धुळे ग्रामीणराम भदाणे, २ मलकापूर चैनसुख संचेती ३ अकोट प्रकाश भारसाकळे, ४ अकोला पश्चिम विजय अग्रवाल, ५ वाशिम श्याम खोडे, ६ मेळघाड केवलराम काळे, ७ गडचिरोली मिलिंद नरोटे, ८ राजुरा देवराम भोंगळे, ९ ब्रह्मपुरी कृष्णलाल सहारे, १० वरोरा करण संजय देवतळे, ११ नाशिक मध्य देवयानी फरांदे, १२ विक्रमगड हरिश्चंद्र भोये, १३ उल्हासनगर कुमार ऐलानी, १४ पेण रावींद्र पाटील, १५ खडकवासला भीमराव तपकीर, १६ पुणे छावणी सुनील कांबळे, १७ कसबा पेठ हेमंत रासणे, १८ लातूर ग्रामीण रमेश कराड, १९ सोलापूर शहर मध्य देवेंद्र कोठे, २० पंढरपूर समाधान औताडे, २१ शिराळा सत्यजीत देशमुख, २२ जत गोपीचंद पडळकर

## ठाकरेंकडून दिवंगत नेते अभिषेक घोसाळकर यांच्या पत्नीला उमेदवारी; महिलेविरोधात महिला सामना रंगणार!

मुंबई : शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे दिवंगत नेते अभिषेक घोसाळकर यांची फेसबूक लाईव्ह करून हत्या करण्यात आली होती. त्यांच्या पत्नीला आता उद्धव ठाकरे यांनी उमेदवारी दिली आहे. तेजस्वी घोसाळकर यांना दहिसर येथून उमेदवारी देण्यात आली असून उद्धव ठाकरेंनी त्यांना एबी फॉर्महीही दिला आहे. ८ फेब्रुवारी रोजी शिवसेना (उद्धव ठाकरे) पक्षाचे माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर यांची फेसबूक लाईव्ह करून हत्या करण्यात आली होती. या हत्येत मॉरिस नोरान्हा उर्फ मॉरिसभाईने यांचं नाव समोर आलं होतं. जनतेत मिसळणारं जोडपं म्हणून घोसाळकर पती-पत्नीची ओळख होती. तर, अभिषेक घोसाळकर यांचे वडील विनोद घोसाळकर हे उद्धव ठाकरे यांचे कट्टर समर्थक आणि या मतदारसंघाचे माजी आमदार राहिले आहेत. त्यामुळे दहीसर विधानसभा मतदारसंघातून तेजस्वी घोसाळकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे. उद्धव ठाकरे यांनी आजच हरून खान, भैरुलाल चौधरी जैन आणि संजय भालेराव या तिघांची नावे जाहीर केली होती. परंतु, तेजस्वी घोसाळकर यांचं नाव जाहीर केलं नव्हतं. उद्धव ठाकरे यांनी घोसाळकर यांच्या कुटुंबीयांकडे एबी फॉर्म दिला होता. या मतदारसंघातून विनोद घोसाळकर आणि तेजस्वी घोसाळकर या मतदारसंघातून इच्छूक होत्या.

**भारताचा दारूण पराभव**

**फलंदाजीतील अपयश भारताच्या पराभवाचे प्रमुख कारण**

## पुण्यात पानिपत; १२ वर्षांनंतर भारतीय संघाने मायदेशात गमावली कसोटी मालिका

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : न्यूझीलंडने पुण्यात भारताचे पानिपत करत सलग दुसऱ्या कसोटी सामन्यात दारुण पराभव केला. या पराभवसह भारतीय संघाला १२ वर्षांनंतर प्रथमच मायदेशात कसोटी मालिका गमवावी लागली आहे. याआधी भारताने २००२ मध्ये इंग्लंडविरुद्ध शेवटची कसोटी मालिका गमावली होती. पुण्यातील सामन्यात न्यूझीलंडने भारतीय संघाला ३५९ धावांचे लक्ष्य दिले होते. प्रत्युत्तरात भारतीय संघाने २४५ धावांतच न्यूझीलंडच्या फिरकीसमोर गुडघे टेकले. ज्यामुळे किवी संघाने ११३ धावांनी विजय मिळवत तीन सामन्यांच्या मालिकेत २-० अशी अभेद्य आघाडी घेतली. या सामन्यात भारतीय फलंदाजांनी मिचेल सँटनरसमोर सपशेल शरणागती पत्करली. या विजयासह न्यूझीलंडने भारतात पहिल्यांदाच कसोटी मालिका जिंकली. न्यूझीलंडचा संघाने तीन सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-० ने अभेद्य आघाडी घेतली आहे. भारताने पुण्यातील दुसरा कसोटी सामना गमावत २०१२ नंतर प्रथमच घरच्या मैदानावर कसोटी मालिका गमावली. २०१२ मध्ये इंग्लंडविरुद्ध खेळलेल्या गेलेल्या चार सामन्यांच्या कसोटी मालिकेत २-१ असा भारताला पराभव पत्करावा लागला होता. या मालिकेत इंग्लंडच्या गोलंदाजांनी भारताच्या फलंदाजांवर वर्चस्व गाजवले होते. या मालिकेत भारताचे सचिन तेंडुलकर आणि वीरेंद्र






सेहवाग सारखे दिग्गज अपयशी ठरले होते. आता १२ वर्षांनंतर भारताला मायदेशात कसोटी मालिका गमवावी लागली आहे.

२००० नंतर भारतात कसोटी मालिका जिंकणारा न्यूझीलंड हा चौथा संघ आहे. यापूर्वी दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया आणि इंग्लंडने ही कामगिरी केली होती. यासह टीम इंडियाचा घरच्या मैदानावर सलग १८ मालिका विजयांची मालिका खंडीत जाली. न्यूझीलंडसाठी मिचेल सँटनरने पहिल्या डावात सात आणि दुसऱ्या डावात सहा विकेट्स घेतल्या. भारताकडून यशस्वी जैस्वालने सर्वाधिक ७७ धावा केल्या. याशिवाय रवींद्र जडेजाने ४२ धावांची खेळी केली.

या दोघांशिवाय अन्य कोणताही फलंदाज २५ हून अधिक धावा करू शकला नाही. कर्णधार रोहित शर्मा आठ धावा करून बाद झाला, शुबमन गिल २३ धावा करून बाद झाला, विराट कोहली १७ धावा करून बाद झाला, ऋषभ पंतला खातेही उघडता बाद झाला, सर्फराझ खान नऊ धावा करून बाद झाला आणि रविचंद्रन अश्विन १८ धावा करुन बाद झाला. आकाश दीप एक धाव करू शकला आणि जसप्रीत बुमराह १० धावा करून नाबाद राहिला. न्यूझीलंडकडून मिचेल सँटनरने सर्वाधिक ६ विकेट्स घेतल्या.

न्यूझीलंडने पहिल्या डावात १०३ धावांची आघाडी घेतली होती, अशा स्थितीत टीम इंडियाला किवी संघाला छोट्या धावसंख्येपर्यंत रोखणे आवश्यक होते. पण इथे न्यूझीलंडचा कर्णधार टॉम लॅथम भारताच्या मार्गात अडथळा ठरला, ज्याने ८६ धावांची खेळी करत टीम इंडियाला विजयापासून दूर नेले. टॉम ब्लंडेल आणि ग्लेन फिलिप्स यांनीही अनुक्रमे ४१ आणि ४८ धावांचं योगदान दिलं, पण टॉम लॅथमची अर्धशतकी खेळी भारतासाठी सर्वाधिक नुकसानकारक ठरली.

फलंदाजीतील अपयश हेही भारताच्या पराभवाचे प्रमुख कारण होते. पुणे कसोटीच्या दोन्ही डावांत रोहित शर्माला दुहेरी आकडाही गाठता आला नाही, तर विराटने दोन्ही डावांत मिळून केवळ १८ धावा केल्या. त्याच्याशिवाय मधल्या फळीतील ऋषभ पंतने पहिल्या डावात १८ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात त्याला खातेही उघडता आले नाही. बेंगळुरू कसोटी शतकवीर सर्फराझ खान यावेळी कोणतीही जादू दाखवू शकला नाही. एकूणच, फलंदाजीतील अपयश हे टीम इंडियाच्या मालिका पराभवाचे प्रमुख कारण बनले आहे.

# भक्तीचे अंतरंग चिंतन : भूमिपुत्र वाघ

भक्तीचे अंतरंग हा जेवढा विषय खोलवर घेऊन जाऊ तेवढा तो खोलवर जाऊ शकतो. पृथ्वी आकाश पातळाचं मोजमाप करता येत नाही,तेवढीच उंची आणि खोली भक्तीच्या अंतरंगात आहे. म्हणून भक्ती,ध्यान साधना, तपश्चर्य पूर्ण झाल्यानंतर साक्षात्कार होतो.दिव्य ज्ञानाची प्राप्ती होतं असते. तथागत गौतम बुद्ध,सर्वश्रेष्ठ विश्ववंदनीय संत तुकाराम महाराज,संत ज्ञानेश्वर,मुक्ताई,संत चोखोबा,रोहिदास,कान्होत्रा, गोरबा काका असे अनेक संत अगदी सांगायचं झाल्यास एकलव्यापर्यंत भक्तीच्या अंतरंगात ईश्वरीय शक्तीचा साक्षात्कार घडवून आणला.मनाला भावणारी भक्ती त्याचे विषय सहज आणि सोप्या भाषेमध्ये संतांनी आपल्यासमोर ठेवलेले आहेत.तोच विषयाचा गाभा घेऊन आपल्या समोर भक्तीचे अंतरंग हा विषय आपल्या समोर ठेवण्याचा प्रयत्न करतो आहे.आणि तो माझा धर्म आहे असे मी समजतो.

भक्तीचे अंतरंग पाहताना आपशुकच भक्तीचे भाय्यरंग येणारच आहेत. तेव्हा त्याचाही विचार करणे योग्यतेचे होईल.

प्रथम आपण अंतरंगाची मिमांचा करणार आ-होत.

मुळात भक्ती ही निर्माण कशी होते.तर ती श्रद्धेतून, अध्यात्मातून,विचारातून, आणि आपल्यावर झालेल्या संस्कारातून निर्माण होत असते.ज्या कुटुंबात,ज्या जातीत ज्या धर्मात आपला जन्म होतो तेथून विचार प्रवाहाची निर्मिती होते. त्यातूनच श्रद्धा आणि भक्तीचा प्रवास सुरू होतो.

भक्तीचे अनेक पैलू आणि अंतरंग आपणास पहावयास मिळतात. कुटुंबातील नातेवाईकांच्या कडून खऱ्या अर्थाने संस्कार होतात.आणि त्या संस्कारातून भक्तीची सुरुवात होते.इथे आपण समजण्यासाठी तीन धर्माची उदाहरणे घेणार आहोत. आपला जन्म मुस्लिम कुटुंबात झाला असेल तर आपण मज्जीदीमध्ये जाऊन ईश्वराचा स्तवन करू. आपला जन्म वारकरी कुटुंबात झाला असेल तर आपण देवळात जाऊन विठ्ठलाचं नामस्मरण करू. आपला जन्म ख्रिश्चन समाजामध्ये झाला असेल तर आपण इशू प्रभूचं नामस्मरण करू.

भक्ती आणि नामस्मरण करण्यासाठी नावे वेगळी आहेत मार्ग मात्र एकच आहे.ज्यातून ईश्वरीय भक्ती समर्पित होत असते.कोणी अल्ला म्हणेल.कोणी येशू प्रभू म्हणेल.तर कोणी विठ्ठल म्हणेल.भक्ती नामस्मरण आणि प्रार्थनां,हे भक्तीत रमण्याचं,अंतमुख होण्याचं मुख्य साधन आहे..

भक्तीचे अंतरंग पहात असताना अंतर्मनातील साधना,चिंतन,तपश्चर्या, नामस्मरण,भावगीत, अभंग हे सर्व भक्तीच्या अंतरंगातील मार्ग आहेत. षढरिपू मुक्त जीवन जगणे ही सुद्धा एक भक्तीच आहे. आपण जीवन जगत असताना आई वडील आजी आजोबा घरातील थोर भावंडे आणि घरातील देवघर यास सहजपणे मन प्रसन्न ठेवून नतमस्तक होतो तो सुद्धा भक्तीच्या अंतरंगातला एक साधा सोपा मार्ग आहे.जर त्याचं जाणून-बुजून प्रदर्शन झालं. मी पुन्यवान आहे.असा गर्व मनाला शिऊन जरी गेला.तर ते सुद्धा भाय्यांग ठरू शकते.

दुसऱ्यांच्या प्रति आदर ठेवणं,गोड बोलणं, आपल्या बोलण्यातून दुसऱ्याचं मन दुखणार नाही याची काळजी घेऊन जगणं,लहान आणि थोरामोठ्यांचा आदर करणे ही सुद्धा भक्तीच होय. सत्कार्य करतो ती भक्ती. ईश्वराचं नामस्मरण करतो ती भक्ती.सत्कार्याला मदत करतो ती भक्ती. दुसऱ्यांच्या चेहऱ्यावरचं दुःख बाजूला सारून त्याच्या चेहऱ्यावरचं हसू फुलविण्यासाठी कार्य करतो ती सुद्धा एक प्रकारची भक्तीच होय. भुकेल्यांसाठी अण्ण, तहानलेल्यांसाठी पाणी ती सुद्धा भक्तीच होय.संत एकनाथ यांनी गाढवाला पाणी पाजून जीवदान दिलं ती सुद्धा भक्तीच होय. निसर्गाच्या रक्षणार्थ जे जे आपण काम करतो ती सुद्धा भक्ती होय.

खरं तर सत्कार्य आणि भक्ती हे दोन्ही मार्ग भक्तीच्या अंतरंगाचे मुख्य पैलू आहेत.सत्कार्याच्या




लाखो पैलूची आपण समाजामध्ये अनुभूती घेत असतो.ज्यातून पृथ्वीतलावरच्या जीवांचा आदर होतो.मदत करतो. ती खरी भक्ती होय.हे सर्व भक्तीचे अंतरंग आहेत. दुसऱ्याची तहानभूक ओळखणे,परोपकार करणे, दुसऱ्यांच्या सुखासाठी आपलं श्रमदान,अर्थदान, विचारदान सांगण्याचा अर्थ असा की परोपकारी जीवन जगत असताना सत्कार्याच्या मार्गाने आपण जातो.दुसऱ्यांच्या सुखाचा विचार करतो.आणि तसे कार्य करत जगत असतो. ती सुद्धा एक भक्ती होय.हे सर्व भक्तीचे अंतरंग आहेत. यातून आपल्या जीवनाचा मनाचा आणि शरीराचा प्रवास सुखकर होतो. म्हणूनच अशा व्यक्तींना साधू किंवा संत समजले जाते.इतकी साधी सोपी विचारधारा अंतरंगात दिसून येते.

आता आपण भक्तीचे भाय्यांग कसे आहे?ते आपण समजून घेणार आहोत.भक्तीचा गाजावाजा करणे.मोठमोठे आवाज काढून देवाचं नाव घेणे. कपड्यांचे रंग बदलावे तसे मनाचे रंग बदलणे.जत्रा उरूस भरविणे भोंगे लावणे.रस्त्यावर किंवा रस्ते अडवून प्रार्थना म्हणणे. प्रार्थना स्थळी गर्दी करणे. अंगविक्षेप करणे,देवाच्या नावाने नाचणे यातून जे प्रदर्शन करत असतो ते भक्तीचे भाय्यांग असे समजावे.या भक्तीतून शांतता मिळत नाही.उलट दुसऱ्यांची शांतता भंग पावते.यातून समाधान आनंद आणि किंवा पुण्यही मिळत नाही.यातून मी भक्त आहे याचे प्रदर्शन मात्र झाल्याशिवाय राहत नाही.समाधान कोणालाच मिळत नाही.ना आपल्याला, ना समाजाला. म्हणून साधुसंत महात्म्यानी भक्तीच्या अंतरंगाला अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त करून दिले आहे.आणि तेच विचार आपल्या ग्रंथ अभंगवाणी,ओव्या,काव्य, गीत,भारूड,भक्ती गीत यातून व्यक्त केलं आहे. अंतर्मनातला ईश्वर शोधा म्हणजे सापडेल.हा विचार संतांनी आपल्याला दिलेला आहे.प्रार्थना स्थळी,जत्रा, यात्रा गर्दीत कधीच देव भेटत नाही.आणि त्यातून समाधानही मिळत नाही. परमात्म्याला वश करण्यासाठी आत्मा प्रसन्न हवा.आणि आत्मा प्रसन्न करण्यासाठी शांतता हवी असते.ते नेमकं भाय्यांगातून कधीच मिळत नाही. उलट ते प्रदर्शनच होते.

तेव्हा थोडक्यात भक्तीचे अंतरंग आणि भाय्यरंग पाहत असताना अंतरंगाला जास्त महत्त्व प्राप्त झालेले आहे.किंवा त्यातून प्रत्येकाला समाधान मिळतं.मन प्रसन्न होईल.प्रपंच करण्याची ऊर्जा मिळेल. आपल्या हातातून कुकर्म होणार नाही.हिंसा होणार नाही.

समाज आनंदी राहील. तेव्हा भक्ती ही अंतरंगातील असावी की भाय्यांगातील कधीच असू नये.....

# पंचाचार्य प्रशालेत प्रदूषण मुक्त दिवाळी व बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञा संकल्प



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : तालुक्यातील गौडगाव येथील श्री गुरु सिद्धमल्लेश्वर कल्याण केंद्र संचलित श्री जगद्गुरु पंचाचार्य प्रशालेत प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी व बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंधक प्रतिज्ञाची शपथ घेण्यात आली.

भारतीय परंपरेतील सर्व सण आणि उत्सव यांचं निसर्गाशी अतूट नातं आहे सर्वसामान्य नागरिकांना निरोगी व प्रदूषण मुक्त वातावरण जगण्यासाठी कुठेही पर्यावरणाचा ऱ्हास होणार नाही याची आम्ही दक्षता घेऊ व पर्यावरणाचा समतोल राखू आम्ही सर्वजण असाही संकल्प करतो की दैनंदिन जीवनात ज्या प्लास्टिकमुळे प्रदूषण होते त्याचा वापर करणे आम्ही टाळू आम्ही असाही संकल्प करतो की समृद्ध पर्यावरणाच्या रक्षणाकरिता आमच्या वाढदिवसाला किमान एक झाड लावू व त्याचे नित्यननियमाने संगोपन करू दिवाळी म्हणजे लक्ष दिव्यांचा तेजोमय प्रकाश या दिवाळीत फटाक्यांमुळे हवेचे प्रदूषण होणार नाही याकरिता फटाके न वाजवता प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याचा आम्ही संकल्प करीत आहोत. आम्ही भारताचे भविष्यातील समर्थ नागरिक म्हणून सर्व विद्यार्थी शपथ घेतो की वर्षभरातील सर्व सण व उत्सव प्रदूषण मुक्त साजरे करण्यासाठी कटिबद्ध राहू तसेच बालविवाह रोखण्यासाठी बालविवाह प्रतिबंध प्रतिज्ञा परमेश्वर व्हसुरे यांनी सामूहिकरित्या विद्यार्थीसाठी प्रतिज्ञा घेण्यात आली. यावेळी मुख्याध्यापक कल्याणी देशेट्टी लाडप्पा शिंदे, महेश स्वामी .शिवपुत्र चोळे, शरणया हिरेमठ गंगाधर नागशेट्टी पोपट सोनकांबळे, भारती पोतदार भाग्यश्री पांढरे, सोनाली साठे. रेणुका चांदकोठे, तुकाराम जाधव सुभाष घोडके, काशिनाथ दानशेट्टी. मृत्युंजय सालीमठ. अमरेश तारके रामण्णा लिंबी तोटे, अशोक गुरव आदी उप-स्थित होते.

# निफाड नगरपंचायतच्या वतीने प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याचे आव्हान

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड नगरपंचायत च्या वतीने येणारी दिवाळी हरित व पर्यावरण पूरक, प्रदूषण मुक्त, दिवाळी साजरी करण्याचे आव्हान करण्यात आले असून फटाक्यांची विक्री नगरपंचायतने निश्चित केलेल्या ठिकाणी परवानगी घेऊनच आपले दुकान लावावे असे निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र शासनाने माजी वसुंधरा अभियान स्वच्छ सर्वेक्षण २०२४- २५ आणि स्वच्छ दिवाळी अभियान अंतर्गत फटाके मुक्त, प्लास्टिक मुक्त ,कचरा मुक्त, प्रदूषण मुक्त, व पर्यावरण पूरक, सण उत्सव साजरे करून सदर अभियाना अंतर्गत नागरिकांनी फटाक्याचा वापर टाळावा प्लास्टिकचा वापर टाळून कापडी किंवा कागदी पिशवीचा वापर करावा,. पर्यावरण पूरक प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याचे आव्हान निवेदनाद्वारे करण्यात आले आहे.

भारत सरकार अधिसूचना क्रमांक जी एस आर ६८२( ए) दि.५ १० १९९९ अन्वये १२५ व इ (I)पेक्षा जास्त आवाज निर्माण करणाऱ्या फटाक्यांची निर्मिती विक्री वापर करण्यास मनाई के मनाई केली आहे, अशा फटाक्यांची उत्पादन विक्री किंवा वापर बेकायदेशीर आहे, मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्दर्शनानुसार फटाक्यांमध्ये बेरियम सॉफ्ट, लिथियम, असैनिक, लीड मर्क्युरी, यासारखे घटक असणारे फटाके वापरण्यास बंदी आहे, या घटकांमुळे विषारी वायू तयार होतात हे वायू प्राणी व वनस्पती या दोघांना घातक असून उच्च न्यायालयाने दिलेल्या निर्देशानुसार फटाका विक्रेत्यांनी विस्फोटक व अधिनियम १८८४ आणि त्याच अंतर्गत केलेले विस्फोटक नियम २००८ मधील प्रतिबंध व नियम यांची अंमलबजावणी करणे आवश्यक आहे, तरी फटाके विक्रेत्यांनी बंदी असलेले फटाके विक्री करू नये असे निफाड नगरपंचायत च्या वतीने आव्हान करण्यात आले आहे,

# मोटार सायकल विहिरीत टाकल्याच्या संशयावरून तरुणावर कोयत्याने हल्ला; सहा जणांवर गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : मोटार सायकल विहिरीत टाकल्याच्या संशयावरून तरुणावर कोयत्याने हल्ला करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना २२ ऑक्टोबर रोजी रात्री सव्वादहा वाजण्याच्या दरम्यान बेलाटी गावाजवळच्या हायवेच्या पुलाखाली घडली. याप्रकरणी श्रीकांत रामचंद्र कोकाटे (वय-२८- ,रा.कोकाटे वस्ती,बेलाटी) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून भिवाजी वावरे (वय-३५), महादेव वावरे (वय-४५), मल्लिनाथ माशाळ (वय-३३), मनोहर माशाळ (वय-३४), प्रभू राठोड (वय-४०) व गंजू वावरे (वय-३५) सर्व राहणार बेलाटी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी हे गुरांच्या धारा काढून साडेसात वाजण्याच्या सुमारास बेलाटी गावामध्ये गेले होते.त्यावेळी गावातील डेरी येथे दूध घालून रात्री सव्वा दहा वाजण्याच्या सुमारास घरी परत येत असताना बेलाटी गावाजवळच्या हायवे पुलाच्या खाली फिर्यादी यांच्या गावातील वरील संशयित आरोपी यांनी मोटरसायकल विहिरीत टाकल्याच्या संशयावरून भिवाजी वावरे याने फिर्यादी यांची मोटरसायकल अडवून मनोहर माशाळ याने माझी मोटार सायकल तुच विहिरीत टाकला, आज तुला जिवंत मारतो असे बोलून जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने फिर्यादी यांच्या डोक्यात कोयत्याने वार करून जखमी केले. तसेच मनोहर माशाळे याने त्याच्या हातातील सतुरने फिर्यादी यांच्या पाठीत मारून गंभीर जखमी केले. दरम्यान गजू वावरे याने काठीने व लाथा बुक्क्यांनी मारहाण करत फिर्यादी श्रीकांत कोकाटे यांना जीवे मारण्याचा प्रयत्न केला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पोसई कुतवळ हे करित आहे.



स्वेरीच्या हिरवळीवर चौथा 'योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी कॅनडा मधील योग प्रशिक्षिका जॅकलीन कँम्प यांचे स्वागत करताना इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार सोबत डावीकडून स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी.पी.रोंगे व डॉ. येळीकर तसेच योगा करताना स्वेरीचे प्राध्यापक व विद्यार्थी.

# चेहऱ्यावर हास्य ठेवल्यास सकारात्मक प्रतिसाद मिळतो : योग प्रशिक्षिका जॅकलीन कँप

## स्वेरीत चौथा 'मासिक योग दिन' उत्साहात साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


पंढरपूर- 'चेहऱ्यावरील प्रसन्नता ही खऱ्या अर्थाने आपला आरसा असून प्रसन्न असल्यामुळे यश अधिक गतीने मिळते व आपले कार्य अधिक क्षमतेने पुढे जात असते. यासाठी नियमित योग करणे आवश्यक आहे. आपण योग करताना व प्राणायाम करताना नेहमी प्रसन्न मनाने आणि डोळे बंद करून प्राणायाम केला पाहिजे. डोळे बंद करून प्राणायम केल्यामुळे सकारात्मक उर्जा निर्माण होते तसेच चेहऱ्यावर हास्य ठेवल्यास सकारात्मक प्रतिसाद मिळतो.' असे प्रतिपादन कॅनडा मधील योग प्रशिक्षिका जॅकलीन कँम्प यांनी केले.

'जागतिक योग दिन' हा प्रत्येक वर्षी दि.२१ जून रोजी आंतरराष्ट्रीय स्तरावर अर्थात जगभरात साजरा केला जातो. दि.२१ जून रोजी स्वेरीत मुख्य 'जागतिक योग दिन' साजरा करण्यात आला. यावेळी स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांनी यापुढेही 'स्वेरी अंतर्गत असलेल्या वसतिगृहातील विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक महिन्याच्या दि.२१ तारखेला सामुहिक 'योग दिन' साजरा करण्याचे घोषित केले होते. तेंव्हापासून प्रत्येक महिन्याला न चुकता स्वेरीत 'योग दिन' सुरु आहे. नुकताच हा चौथा 'योग दिन' स्वेरीत साजरा करण्यात आला. विशेष म्हणजे या उपक्रमाला वसतीगृहातील सर्व विद्यार्थ्यांनी उत्साहाने प्रतिसाद दिला. यावेळी कॅनडा येथील योगशिक्षक असलेल्या जॅकलीन कँम्प ह्या मार्गदर्शन करत होत्या. जॅकलीन कँम्प ह्या कॅनडामध्ये पूर्ण वेळ 'आर्ट ऑफ लिव्हिंग' च्या योग प्रशिक्षिका आहेत. तसेच एक योग प्रशिक्षिका म्हणून आजपर्यंत त्यांनी २२ देशांमध्ये प्रवास करून तेथील नागरिकांना योग प्रशिक्षण देण्याचे काम केले आहे. योग अभ्यास किती महत्वाचा आहे ते त्या स्वेरीच्या विद्यार्थ्यांना पटवून सांगत होत्या. यावेळी त्यांनी उपस्थित विद्यार्थी-विद्यार्थिनी व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांच्याकडून सांधे, हाडे, शरीराच्या अवयवांचे तसेच श्वासांचे व्यायाम करवून घेतले. त्यामुळे विद्यार्थी व सर्वजण अधिक उत्साहित दिसत होते. गौरी थोरात, यांच्या सह इतर विद्यार्थ्यांनी 'योग केल्यामुळे आमचा अभ्यासासाठीचा उत्साह वाढला असून शारीरिक आराम देखील मिळत असल्याचे सांगितले. सदरचा कार्यक्रम स्वेरीचे संस्थापक सचिव व कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली, स्वेरीचे कॅम्पस इन्चार्ज डॉ. एम.एम.पवार यांच्या सहकार्याने, डॉ. येळीकर, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा.सतीश मंडवे, इंजिनिअरिंगच्या उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार यांच्या नेतृत्वाखाली, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.महेश मठपती, सर्व अधिष्ठाता, विभागप्रमुख, प्राध्यापक वर्ग, विद्यार्थी, विद्यार्थिनी यांच्या उपस्थितीत पार पडला. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी स्वेरीचा क्रीडा विभाग तसेच अभियांत्रिकी व फार्मसीचे 'राष्ट्रीय सेवा योजना' विभाग, 'कमवा व शिका' योजनेमधील प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन करून उपस्थित सर्वांचे आभार मानले.

# कमिशन खोरीची बसली झळ? पाणी थेंब थेंब गळं

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

तालुका प्रतिनिधी/ मंगरूळपीर : जल जीवन मिशन अंतर्गत शेलगाव ग्रामपंचायत मध्ये सुरू असलेल्या पाण्याच्या टाकीच्या बांधकामामध्ये निकृष्ट दर्जाचा अजून एक पैलू समोर आला आहे. सदर पाण्याची टाकी ही गळत असल्याचे ग्रामपंचायत मधील नागरिक यांच्यामध्ये चर्चा आहे. सदर स्थळाची पाहणी केली असता सदर टाकी ही दोन ठिकाणावर गळत असल्याचे दिसून येत आहे. या संदर्भामध्ये जिल्हा परिषद पाणीपुरवठा विभागाचे




अभियंता गिरी यांच्याशी संपर्क केला असता कंत्राटदाराचे आतापर्यंत केलेल्या कामाचे बिल पूर्ण दिल्याचे समजले. कंत्राटदाराचे बिल देण्याची ज्या पद्धतीने प्रशासनाला घाई झालेली दिसते तेवढी घाई जर पाण्याची टाकी दुरुस्त पद्धतीने बनलेली आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी केल्या गेली असती तर कदाचित बिल अदा करण्याच्या आधीच पाण्याचे टाकीचे काम उत्कृष्ट झाले असते. अद्याप टाकीचे बांधकाम किंवा सदर प्रकल्पाचे काम पूर्ण झाले नसल्याचे कळत आहे तरी सदर काम अपूर्ण असताना याचे बिल काढले जाते मात्र कामाच्या त्रुटी पाण्याच्या थेंबाच्या स्वरूपाने दिसून येत आहे. सर्वसामान्य व्यक्ती जेव्हा आपल्या स्वप्नातील घर बांधतो तेव्हा छतावरून एक थेंब पाणीसुद्धा गळणार नाही याची तो काळजी घेत असतो सामान्यतः त्यासाठी कुठलेही स्ट्रक्चरल इंजिनियर चे ड्रॉइंग त्याच्याकडे नसते फक्त कामाच्या प्रामाणिकतेवर भर देत तो स्वतःचे घर बांधत असतो. मात्र संपूर्ण अभियंतांचा चमू मजबूत स्वरूपाचे डिझाईन्स व प्रशासनाची देखरेख असलेल्या प्रकल्पावर कोट्यावधी रुपये खर्च करून सुद्धा पाण्याचे थेंब टाकीतून गळतातच कसे अशी खंत शेलगाव ग्रामपंचायत मधील सुज्ञ नागरिक व्यक्त करीत आहेत.

# निवडणूक कालावधीत ओपिनियन आणि एक्झिट पोलला प्रतिबंध

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (जिमाका) : भारत निवडणूक आयोगामार्फत महाराष्ट्र राज्य विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ साठीचा कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर आयोगाने निवडणूक कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल तसेच एक्झिट पोल) दर्शविण्यावर प्रतिबंध केला आहे.

भारत निवडणूक आयोगाने विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने १५ ऑक्टोबर २०२४ पासून आदर्श आचारसंहिता लागू झाली आहे. महाराष्ट्रातील २८८ विधानसभा मतदारसंघात दि. २० नोव्हेंबर २०२४ रोजी मतदान होणार आहे. या अनुषंगाने निवडणूक निकालांचे अंदाज १३ नोव्हेंबर २०२४ रोजी सकाळी सात वाजेपासून ते २० नोव्हेंबर २०२४ रोजी सायंकाळी ६.३० वाजेपर्यंतच्या कालावधीत कोणत्याही प्रकारच्या एक्झिट पोलचे आयोजन करणे, कोणत्याही माध्यमांद्वारे प्रकाशन अथवा प्रसारण करण्यास प्रतिबंध लागू राहणार आहे.

त्याचप्रमाणे मतदान संपण्याच्या आधी ४८ तासाच्या कालावधीत निवडणूक निकालांचे अंदाज (ओपिनियन पोल) अथवा अन्य मतदान सर्वेक्षणाच्या परिणामांच्या प्रकाशन अथवा प्रसारणावर प्रतिबंध असेल, असेही निवडणूक आयोगाने अधिसूचनेद्वारे स्पष्ट केले आहे.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### कुबेर कॉम्प्लेक्स जवळ अपघात; एकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : कुबेर कॉम्प्लेक्स जवळ झालेल्या अपघात प्रकरणी एका जनाविरुद्ध विजापूर नाका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हि घटना १९ ऑक्टोंबर रोजी रात्री घडली. याप्रकरणी प्रभाकर चंद्रकांत राऊत (वय-४९,रा. राऊत वस्ती,मजरेवाडी) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून महादेव सुखदेव लोहार (रा. कुमठे) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी यांचा भाऊ राजेंद्र राऊत (वय-४७) हे त्यांची दुचाकी क्रमांक एमएच.१३.ईएच.४६९७ यावरून किराणा सामान आणण्यासाठी जात असताना वरील ठिकाणी माधव लोहार याने त्याच्या ताब्यातील कार क्रमांक सीएच.०१. सीव्ही.६०९१ ही निष्काळजीपणाने चालवून फिर्यादी यांच्या भावाच्या दुचाकीला धडक देऊन जखमी करून वाहनाचे नुकसान करण्यास कारणीभूत झाला आहे. असे फिर्यादीत नमूद आहे. तपास पो.ह.राठोड हे करीत आहेत.

# राजकीय जाहिरातींसाठी माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीची परवानगी घेणे आवश्यक

## जिल्हा माहिती कार्यालयातून जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीचे कामकाज सुरू

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : जिल्ह्यातील सर्व राजकीय पक्ष, उमेदवार, व्यक्ती यांनी राजकीय जाहिरातींचा प्रत्यक्ष वापर / प्रसारण करण्यापूर्वी या जाहिरातींना जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समितीकडून पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे, असे समितीचे अध्यक्ष जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी कळविले आहे.

जाहिरातींमध्ये दूरचित्रवाहिन्या, केबल नेटवर्क/ केबल वाहिन्यांवरचे प्रक्षेपण प्रसारण, चित्रपटगृहे, रेडिओ, खाजगी एफएम, सार्वजनिक ठिकाणी दृकश्राव्य माध्यमाद्वारे (Audio- Video Display) होणारे प्रसारण, ई-वृत्तपत्रांमधील जाहिरातींचे प्रकाशन, बल्क एसएमएस (SMS) / व्हॉईस मॅसेजेस यांचा समावेश होतो. तसेच मुद्रीत माध्यमांमध्ये (Print Media Paper) मतदानाच्या आधीच्या दिवशी तसेच मतदानाच्या दिवशी प्रकाशित केल्या जाणाऱ्या जाहिरातींकरीता देखील माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीची पूर्व परवानगी घेणे आवश्यक आहे.

जाहिरातीचे पुर्वप्रमाणीकरण करण्याच्या दृष्टीने जिल्हास्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व सनियंत्रण समिती स्थापन करण्यात आली आहे. जिल्हा स्तरावरील समितीकडे समितीच्या कार्यकक्षेत येणाऱ्या मतदारसंघातील व्यक्ती किंवा निवडणूक लढविणाऱ्या उमेदवाराने इलेक्ट्रॉनिक मीडियावर जारी करावयाच्या जाहिरातीच्या प्रमाणपत्रासाठी अर्ज करावयाचा आहे. तसेच राज्य स्तरीय समितीकडे सर्व नोंदणीकृत राजकीय पक्ष, संस्था यांनी जाहिरात पूर्व प्रमाणीकरणासाठी अर्ज करावयाचा आहे. या दोन्ही समितीकडून भारत निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार सर्व राजकीय जाहिरातीचे प्रमाणीकरण केले जाते.

जिल्हास्तरावर जिल्हा माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती व राज्य स्तरावर राज्य पूर्वप्रमाणीकरण समिती यांनी मान्यता दिल्याशिवाय राजकीय पक्ष / उमेदवारांनी राजकीय जाहिरातीचे प्रसारण करू नये.

**जिल्हास्तरीय माध्यम प्रमाणीकरण व संनियंत्रण समिती स्थापना –**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशाप्रमाणे विधानसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली माध्यम प्रमाणिकरण व संनियंत्रण समितीची स्थापना दिनांक १५ ऑक्टोबर २०२४ रोजी करण्यात आलेली आहे. जिल्हा माहिती अधिकारी हे समितीचे सदस्य सचिव तथा नोडल अधिकारी आहेत. समितीच्या अन्य सदस्यांमध्ये सोलापूर शहर उत्तर विधानसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अभयसिंह भोसले, केंद्रीय माहिती व प्रसारण मंत्रालयाचे क्षेत्रिय प्रचार अधिकारी अंकुश चव्हाण, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाच्या संगणकशास्त्र विभागाचे प्राध्यापक डॉक्टर श्रीराम राऊत(सोशल मीडिया तज्ञ), सायबर सेल विभागाचे पोलीस निरीक्षक श्रीशैल गजा, सोलापूर आकाशवाणीचे कार्यक्रम अधिकारी सुजित बनसोडे यांचा समावेश आहे.

# शिक्षिका रिंकु जाधवर (धस) यांचा प्रदूषण मुक्त दिवाळीचा संदेश देत 'दीपोत्सवाचा' आगळावेगळा उपक्रम

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनीधी : जिल्हा परिषद प्राथमिक मराठी शाळा उमरगे येथील नवोपक्रमशील विद्यार्थी प्रिय आदर्श शिक्षिका श्रीमती रिंकु अनंतराव जाधवर (धस )या गेल्या अनेक वर्षांपासून 'दीपोत्सव' हा उपक्रम राबवून विद्यार्थ्यांना प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करण्याचा संदेश देत विद्यार्थ्यांना तिखट - गोड फराळाचे वाटप स्वखर्चाने करून विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देत दीपोत्सवाचा आगळा वेगळा उपक्रम राबवितात .



या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांमधील सृजनशक्ती व सुप्त गुणांचा विकास स्वनिर्मितीचा आनंद निसर्गप्रेम यासोबतच मूल्य संस्कार संस्कृतीचे जतन संवर्धन व त्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी विद्यार्थ्यांकडून मातीच्या विविध आकारांच्या पणत्या तयार करून घेऊन त्यांना आकर्षक पद्धतीने रंग व सजावट करून घेतात. विद्यार्थ्यांना आकाश कंदील व भेट कार्डचे प्रात्यक्षिक करून विद्यार्थ्यांकडून आकर्षक आकाश कंदील व भेट कार्ड तयार करून घेऊन परिसरात उपलब्ध असलेल्या पाना फुलांपासून सुबक रांगोळी काढून विद्यार्थ्यांनी स्वतः तयार केलेल्या दिव्यांची आरास करून दिपोत्सव साजरा करत विद्यार्थ्यांना प्रदूषण मुक्त दिवाळी साजरी करत पर्यावरणाचे संरक्षण करण्याचा संदेश देतात. विद्यार्थ्यांना दिवाळीच्या पूर्वी चिवडा लाडूची भेट देऊन दिवाळीच्या गोड शुभेच्छा देतात. दीपोत्सव या उपक्रमामुळे खरोखरच विद्यार्थ्यांमधील कलागुणांना वाव देत संस्कृती व पर्यावरणाचे संरक्षण जतन संवर्धन करता येते तसेच विद्यार्थी स्वनिर्मितीचा आनंद घेतात .शिक्षिका रिंकू जाधवर (धस ) या विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण व्यक्तिमत्व विकासासाठी सतत नाविन्यपूर्ण उपक्रम राबवत असतात.

# पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे भाजपचे अधिकृत उमेदवार समाधान आवताडे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभेचे उमेदवार म्हणून भाजपने विधानसभा निवडणुकीसाठी आपल्या बावीस उमेदवाराची दुसरी यादी जाहीर केली आहे यामध्ये अखेर पंढरपूर सस्पेन्स सुटला आहे पुन्हा समाधान आवताडे यांनाच उमेदवारी देण्यात आली आहे.



यामध्ये पंढरपूर मंगळवेढा विधानसभा समाधान आवताडे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे. भाजपने विधानसभा निवडणुकीत यामध्ये काही ठिकाणी नवीन उमेदवारांना संधी देण्यात आली आहे भाजपने जाहीर केलेल्या दुसऱ्या यादीत सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर मतदारसंघातून समाधान आवताडे यांना पुन्हा उमेदवारी देण्यात आली आहे त्यामुळे प्रशांत परिचारक यांचा पत्ता कट झाला आहे तर सोलापूर शहर मध्य मधून देवेंद्र कोठे यांनाही संधी देण्यात आले आहे.

दरम्यान भाजपने यापूर्वी ९९ उमेदवार नावाची घोषणा केली होती त्यानंतर आज २२ उमेदवार नावाची घोषणा करण्यात आली आहे यामध्ये अखेर पंढरपूर सस्पेन्स सुटला आहे पुन्हा समाधान आवताडे यांना उमेदवारी देण्यात आली आहे त्यामुळे प्रशांत परिचारक आता काय निर्णय घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. ते पवार गटातून निवडणूक लढवणार असल्याचे देखील नागरिकांमध्ये चर्चा सुरू आहे.

# अक्कलकोटची विधानसभा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया लढवणार : दत्ता कांबळे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी : नव्याने स्थापन झालेल्या रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.राजरत्न आंबेडकर यांच्या आदेशानुसार व त्यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रातील प्रत्येक विधानसभा मतदारसंघात उमेदवारी थांबविण्याची तयारी जवळपास निश्चित केली असून अक्कलकोट विधानसभेची निवडणुक रवि गायकवाड व दत्ता कांबळे यांच्यापैकी एकाला उमेदवारी मिळण्याची शक्यता आहे. अशी माहिती रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्ता कांबळे यांनी पत्रकाराशी बोलताना दिली आहे.

डॉ.राजरत्न आंबेडकर हे एक अत्यंत अभ्यासू, वैचारिक व आर्थिक सामाजिक आणि न्यायावर आधारित कार्यावर कार्यकरत असून भारतीय बौद्ध महासभा या संघटनेच्या वतीने व या संघटनेच्या माध्यमातून हजारो बुद्ध विहार विहाराची निर्मिती केली आहे. देश विदेशात जाऊन आपल्या भारतीय देशाची व्यथा मांडून बहुजन समाजावर होणाऱ्या अन्याय अत्याचार व भिकू संघाची कतले,बौद्ध धर्माची अपप्रचाराची मनुवादयानी चालवलेली षडयंत्र अशाप्रकारे अनेक समस्यावर निराकरण करण्यासाठी आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कार्यकरत आहेत. डॉ. राजरत्न आंबेडकर यांना येणारा काळ हा महाभयंकर असल्याची खात्री पटल्याने राजकीय क्षेत्र उतरला आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया या पक्षाकडून अक्कलकोट विधानसभेची निवडणूक लढण्याची



जवळपास तय झाली असुन रवी गायकवाड व दत्ता कांबळे यांच्यापैकी एकाला पक्षाकडून उमेदवारी मिळणार आहेत. रवी गायकवाड हे आरपीआयचे पाश्चिम महाराष्ट्रचे उपाध्यक्ष म्हणून त्याची निवड केली आहे. ते गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक क्षेत्रात अग्रेसर असून त्यांनी आतापर्यंत शेकडो लोकांची सेवा व अन्याय त्याच्यावर वाचा फोडण्याचे काम केले आहे. तसेच मानव सेवा फाउंडेशन या संघटनेच्या माध्यमातून सामुदायिक विवाह सोहळा,मोफत गॅस वाटप व संजय गांधी निराधार योजनेचे अशा अनेक कामे केलो आहे.असे आरपीआयचे तालुका अध्यक्ष दत्ता कांबळे यांनी सांगितले.

# निसार चांद शेख यांच्याकडून महाप्रसाद, दिवसभरात दहा हजार लोकांनी घेतला महाप्रसाद

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/प्रतिनिधी :अक्कलकोट तालुक्यातील गौडगाव येथील समर्थ रामदास स्वामी कालखंडात स्थापित दक्षिणमुखी जागृत मारुती मंदिरात, मारूतीचे दर्शन घेण्यासाठी हजारो भाविक भक्तानी शनिवारी मोठी गर्दी केली होती. यावेळी जागृत मारुती मंदिरात मोठ्या भक्तीमय व मंगलमय वातावरणात धार्मिक विधिवत पूजा केले. तसेच आलेल्या भक्तांनी जागृत मारुती अन्नछत्रामध्ये महाप्रसाद घेऊन तृप्त झाले.

कर्नाटक, आंध्र व महाराष्ट्र सह अन्य राज्यातील हजारो भाविक,भक्तांनी मारुतीच्या दर्शनासाठी गौडगाव येथे मोठी गर्दी केल्याचे दिसून आले.शनिवारी पहाटे चार वाजता मारुतीस महारुद्राभिषेक,होम हवन, शनि पूजा, गजलक्ष्मी पूजा होऊन महाआरती संपन्न झाली दुपारी बारा वाजता विशेष महाआरती कार्यक्रम पार पडला.दर्शनासाठी आलेल्या प्रत्येकांना हनुमान चालीसा व मारुती चे फोटो देण्यात आले. यावेळी पर राज्यातून आलेल्या भाविक भक्तांनी भक्तीचा माहोल निर्माण केले.अकरा शनिवार व मंगळवार मारुतीचे दर्शन केल्याने इडा पिडा दूर होतो.व मनातील मनोकामना पूर्ण होत असते.अशी भाविकांची श्रद्धा आहे.म्हणुन भाविक भक्तांची मोठी गर्दी मंदिरात दिसून येतात.

**गौडगाव येथील दक्षिणमुखी जागृत मारुती मंदिरात भक्तांची मांदियाळी**

गौडगाव चे सुपुत्र मारुती भक्त निसार चांद शेख यांच्या वतिने मारुती अन्नछत्र मंडळात महाप्रसादाचे आयोजन केले होते.शनिवारी सकाळी सात वाजेपासून सुरू झालेला महाप्रसाद सायंकाळी सात वाजेपर्यंत सुरू होता.पंच पकवान महाप्रसादाने भक्त तृप्त झाले होते. दिवसभरात जवळपास दहा हजार अधिक भक्तांनी महाप्रसादाचे लाभ घेतले. या बरोबरच स्थानिक गावकऱ्यांनी देखील या प्रसादाच लाभ घेतले.यावेळी महात्मा बसवेश्वर ब्लड बँक सोलापूर यांच्याकडून रक्तदानाचे आयोजन केले होते. ब्लड बँकेचे रूपा दिवेकर, सुमित कटाळे, संतोष थोरात याचे सहकार्य मिळाले. यावेळी मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीकांत खानापुरे, सिद्राम वाघमोडे प्रकाश मेंथे, चौडप्पा सोलापुरे, बिराप्पा पुजारी, शांतया स्वामी, प्रकाश सनकळ, ज्ञानेश्वर फुलारी, परमेश्वर सुतार, मल्लिनाथ शेरीकर भारत नन्नवरे



शिवप्पा फुलारि व मंदिराचे सेवेकरी आदी उपस्थिती यावेळी होते.

**अन्नदान पार शिवलोकात,तिन्ही लोकात अन्नदान सारखे श्रेष्ठदान नाही.म्हणून अन्नदान करण्याची माझ्या दिराची इच्छा आहे.त्यासाठी श्री जागृत मारुती अन्नछत्र मंडळात वर्षातून तिन ते चार वेळा अन्नदान देत आहे.जेव्हा अन्नदानास सुरवात केले.त्या दिवसापासून प्रगती मध्ये वाढ झालेली आहे.यापुढेही अन्नदान सुरू ठेवणार आहे.**

**महाबुबी वजीर शेख –रा.गौडगांव,ता अक्कलकोट**

**सर्वसामान्यांना मदत करणारी नेतृत्व** मनसे

# पंढरपूर मंगळवेढा मतदारसंघातील नागरिकांनी मनसे नेते दिलीप धोत्रे यांना विजयी करण्याचा केला निर्धार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघाचे महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अधिकृत उमेदवार दिलीप बापू धोत्रे यांना विजयी करण्याचा मतदारसंघातील नागरिकांनी निर्धार केला आहे.

आधी केले या युक्तीप्रमाणे दिलीप धोत्रे यांनी अनेक वर्षापासून मतदार संघातील नागरिकांचे हित डोळ्यासमोर ठेवून काम केलेले आहे नगरपालिका वाडीवकर रद्द करणे. हिंदू-मुस्लीम मशानभूमीची दुरुस्ती करणे रस्त्यावरचे खड्डे रस्ते दुरुस्त करणे. शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतकऱ्यांना मदत करणे. तरुणांना नोकरी उपलब्ध करून देणे. व व्यवसाय करणाऱ्यांना आर्थिक मदत करणे.



कोविडच्या काळामध्ये हॉस्पिटल उपलब्ध होत नव्हते बीड मिळत नव्हते. पल्स कोल्ड हॉस्पिटल ची निर्मिती तसेच एकही नागरिक उपाशी झोपणार नाही याची काळजी त्यांनी घेतली होती.

त्यामुळे दिलीप धोत्रे यांच्याकडे सर्वसामान्य मदत करणारी नेतृत्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात आहे सध्या पंढरपूर मंगळवेढा विधानसभा मतदारसंघात अनेक वर्षापासून प्रलंबित असलेले रस्ते वीज पाणी आणि विविध विकासाची कामे मार्गी लावण्यासाठी तसेच बेरोजगार तरुणांना हाताला काम मिळणे त्यासाठी लवकरात लवकर एमआयडीसीची उभा करणे व महिलांना सक्षम बनवण्यासाठी लघुउद्योग निर्माण करणे व शेतकऱ्यांच्या शेतमाला योग्य भाव मिळणे मिळवून देण्यासाठी मनसेने ते दिलीप बापू धोत्रे यांना निवडून आणण्याचा नागरिकांनी निर्धार केला आहे.

# सहलीसाठी आलेल्या मुलीचा मृत्यू; मुख्याध्यापकासह इतर लोकांविरुद्ध गुन्हा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, (प्रतिनिधी) : सहलीसाठी आलेल्या आठ वर्षाच्या मुलीच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी शाळेच्या मुख्याध्यापकासह संबंधित इतर लोकांविरुद्ध जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना ४ फेब्रुवारी २०२४ रोजी दुपारी तीन वाजण्याच्या दरम्यान शावर अँड टॉवर वॉटर पार्क सोलापूर येथे घडली. याप्रकरणी नितीन मुरलीधर मस्के (वय-४२,रा. केशवराज गल्ली, गेवराई जिल्हा बीड) यांनी तब्बल आठ महिन्यानंतर दि.२५ ऑक्टोंबर २०४ रोजी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून गणेश पंडितराव क्षीरसागर (रा.गेवराई जिल्हा बीड शाळेचे मुख्याध्यापक व संबंधित इतर लोक) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, फिर्यादी यांची मुलगी प्रांजल मस्के (वय-८) ही तिच्या शाळेच्या सहलीमध्ये इतर मुलांसोबत हिप्परगा सोलापूर येथील शॉवर अँड टॉवर वॉटर पार्क या ठिकाणी सहलीकरिता आली होती.त्यावेळी तिच्या मैत्रिणीबरोबर वेवपूल मधील पाण्यात खेळत असताना खोल पाण्यामध्ये खेळत जाऊन पाण्यात पडून तिच्या नाकात तोंडात पाणी जाऊन ती मयत झाली आहे. तसेच वॉटर पार्क मध्ये सहली करिता आलेल्या लहान मुलांची जबाबदारी असणाऱ्या हिरा पब्लिक स्कूल गेवराईचे संस्थाचालक व संबंधित इतर लोकांनी प्रांजल हिच्या हालचालीकडे लक्ष न देता निष्काळजीपणाने हयगयीने कृत्य करून तिच्या मरण्यास कारणीभूत झाले आहेत. असे फिर्यादीत नमूद आहे. पुढील तपास पोसई.बोमणे हे करीत आहेत.

## थोडक्यात...

### आज मेहकर येथे अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया व रक्त दान शिबिराचे आयोजन व पुरस्कार वितरण सोहळा

बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी / राहुल साबळे : मानवाने विज्ञानातील प्रगतीच्या जोरावर सर्व काही साध्य केले आहे मात्र रक्त निर्मिती करता आलेली नाही.अशातच राज्यात व जिल्ह्यात रक्ताचा तुटवडा निर्माण होत असतो.हि परिस्थिती लक्षात घेता

तथागत बहुउद्देशीय संस्था, मेहकर द्वारा आयोजित, तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना, राजमाता माँ जिजाऊ स्वयंसहायता महिला बचत गट यांच्या संयुक्त विद्यमाने मेहकर येथे भव्य रक्तदान व अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे, तरी मेहकर व लोणार तालुक्यातील सर्व रक्त दात्यानी

२७आक्टोंबर रोजी सकाळी नऊ ते बारा वाजेपर्यंत डॉ बाबासाहेब आंबेडकर वाटीका अशोका हॉल मेहकर येथे रक्तदान करावे.व अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे तथागत बहुउद्देशीय संस्था संस्था मेहकर व्दारा.व तथागत ग्रुप महाराष्ट्र राज्य सामाजिक संघटना.राजमाता जिजाऊ स्वयंसहाय्यता महिला बचत गट व जिजामाता हॉस्पिटल महीला आरोग्य केंद्र सिंदखेडराजा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन केले आहे . तथागत बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष संदीप गवई यांनी आवाहन केले आहे.

# अक्कलकोट येथे भाजपा, काँग्रेस, रासप, वंचित आघाडीच्या प्रचाराचा धडाका

## निवडणूक धूमशान; शांभवी कल्याणशेट्टी यांनी सुरुवात केले होम टू होम प्रचाराला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट/(अक्कलकोट तालुका राजकीय वार्तापत्र कमलाकर सोनकांबळे) : अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील ग्रामीण भागामध्ये काँग्रेस, भाजपा, वंचित बहुजन आघाडी, राष्ट्रीय समाज पक्ष, अपक्ष उमेदवार मनसे उमेदवारांकडून विधानसभा निवडणुकीतील प्रचारावर भर देण्यात आला आहे. सर्वच उमेदवारांनी गाव भेट दौऱ्यावर भर दिला आहे. प्रचाराची चर्चा सोशल मीडियावर रंगली आहे. भाजपाचे आ. सचिन कल्याणशेट्टी व माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी प्रत्येक गाव प्रचारासाठी पिंजून काढीत आहेत. सोशल मिडीयावर प्रचार फलक संवाद क्लिप समर्थकांच्या प्रतिक्रिया यामुळे प्रचाराचे युद्धच पेटले आहे, अशी स्थिती आहे. एकही अर्ज अद्याप दाखल नसताना पुर्वाधार प्रचार गावभेट दौरा चालू आहे. उमेदवारी अर्ज दाखल छाननी व माघार नंतर खरे चित्र स्पष्ट होणार आहे.

आघाडीचे उमेदवार माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, वंचित बहुजन आघाडीचे उमेदवार संतोषकुमार इंगळे, राष्ट्रीय समाज पक्षाचे उमेदवार सुनील बंडगर यांनी अक्कलकोट विधानसभा मतदारसंघातील विविध गावात प्रचारासाठी जोर दिला आहे. भाजपाने विद्यमान आ. सचिन कल्याणशेट्टी यांना दुसऱ्यांदा उमेदवारी दिली आहे. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी विकासकामांच्या मुद्यांवर भर देत मतदारांना मतदान करण्याचे आवाहन केले आहे. काँग्रेस पक्षाकडून माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी विविध गावात प्रचाराचा धडाका उडवून दिला आहे. माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी ग्रामीण भागात आजपर्यंत त्यांनी मतदारसंघात केलेल्या विकासकामांच्या बळावर मतदान करण्याचे आवाहन मतदारांना केले आहे. कुरनूर धरण उजनीचे पाणी या मुद्यांवर भाजप व काँग्रेस दोन्ही पक्षाकडून श्रेयाची लढाई तीव्र पद्धतीने पहावयास मिळत आहे. सुनील बंडगर यांनी ग्रामीण भागातील प्रचारावर जोर दिला आहे. त्यांनी धनगर समाजाचे आरक्षण तसेच स्थानिक मुद्यांवर भर देत आहेत. वंचित बहुजन आघाडीचे कर्जाळ येथील उमेदवार संतोषकुमार इंगळे यांनी गाठीभेटीत व्यस्त असून वंचित आघाडीचे उमेदवार संतोषकुमार इंगळे यांच्या प्रचारार्थ पदाधिकारी व कार्यकर्ते हे ग्रामीण भागात प्रचार करत असून वंचित आघाडीला मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. संतोषकुमार इंगळे यांनी विविध गावात प्रचार दौरा करून मतदारांना मतदान करण्याचे आवाहन करत आहेत. अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात काँग्रेसचे उमेदवार माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, भाजपाचे उमेदवार आ. सचिन कल्याणशेट्टी, वंचितचे उमेदवार संतोषकुमार इंगळे, रासपाचे उमेदवार सुनील बंडगर यांनी ग्रामीण भागात प्रचारासाठी कंबर कसल्याने मतदारांमध्ये याची चर्चा रंगली आहे.

इंगळे यांना उमेदवारी देऊन अक्कलकोटल विधानसभा मतदारसंघातून संधी दिली आहे. वंचितचे उमेदवार संतोषकुमार इंगळे यांच्या प्रचारासाठी कार्यकर्ते जोर देत आहेत. भाजपा महायुतीचे उमेदवार आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी आपल्या प्रचाराचा शुभारंभ हा अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ तसेच श्री मल्लिकार्जुन देवस्थान, हैद्रा येथील हजरत खाजा सैफ मुलुख चिस्ती यांचे दर्शन घेऊन केला. आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दुधनी मैंदर्गी वागदरी हैद्रा, नागणसूर, तोळणूर, चुंगी, कुरनूर, मोट्याळ, हालहळ्ळी अ, बऱ्हाणपूर, डॉबरजवळगे, बोरेगाव, दर्शनाळ, पितापूर, नन्हेगाव, सुलतानपूर, चपळगाववाडी, सिंदखेड आदी गावात कॉर्नर बैठक, कार्यकर्त्यांची बैठक घेऊन प्रचार करण्यात आला.



**रिपाईचे वेन्ट अँड वॉच**

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले) गटाचे अक्कलकोट तालुक्याच्या वतीने एक महत्वपूर्ण बैठक घेण्यात आली असून तालुक्यातील सर्व कार्यकर्त्यांचे मत जाणून घेण्यात आले आहेत बैठकीतील अहवाल वरिष्ठाकडे पाठवण्यात आले असून प्रदेश अध्यक्ष राजाभाऊ सरवदे यांच्या आदेशान्वये पुढील निर्णय घेण्यात येईल असे तालुकाध्यक्ष अविनाश मडीखांबे यांनी सांगितले.

अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात भाजपा महायुतीचे उमेदवार आ. सचिन कल्याणशेट्टी, काँग्रेस महाविकास आघाडीचे उमेदवार सिद्धाराम म्हेत्रे यांच्या कार्यकर्त्यात अक्कलकोट विधानसभा मतदारसंघात विविध कामाबाबत सोशल मीडियावरही जोरदार चर्चा चालू आहे.

वागदरी गावात शांभवी कल्याणशेट्टी यांचे होम टू होम प्रचाराला मोठ्या उत्साहात सुरुवात करण्यात आले असून गावातील सर्व मतदाराचे गाठीभेटी घेऊन घर भेटी देत आहेत.

# इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राजकीय लढत भरणे विरुद्ध माने अशीच होणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी/ अतुल सोनकांबळे

इंदापूर विधानसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण तापले असुन तिसऱ्या आघाडीचे उमेदवार माजी जिल्हा परिषद सदस्य प्रवीण माने यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर जुनी मार्केट कमिटीच्या मैदानावर भली मोठी सभा घेत आजी माजी आमदारांना खुले आव्हान दिले. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे उमेदवार हर्षवर्धन पाटील यांनी देखील उमेदवारी अर्ज दाखल करत खासदार सुप्रिया सुळे यांच्या उपस्थितीत सभा घेतली परंतु प्रविण भैया माने यांच्या सभेसाठी जेवढी गर्दी होती तेवढी गर्दी हर्षवर्धन पाटील यांना ते करता आलेच नाही असी जनतेत चर्चा

दुसरीकडे मात्र आता तिरंगी लढत होणार असल्याने आजी-माजी आमदारांची धाकधूक वाढल्याची चर्चा रंगु लागली. बाबीरबुवाच्या चरणी नतमस्तक होऊन अपक्ष उमेदवार प्रविण भैया माने यांनी गुलाल पुडीत बांधून सभेला आलो आहे. त्या गुलालाची शपथ घेऊन सांगतो की, काहीही केले तरी मी उमेदवारी मागे घेणार नाही. हातातला गुलाल फक्त कपाळाला लावतो. तो उधळण्यावर फक्त



तुमचा अधिकार आहे,' अशा शब्दात आपला इरादा स्पष्ट करत माजी जिल्हा परिषद सदस्य, सोनाई उद्योग समुहाचे संचालक प्रवीण माने यांनी अपक्ष म्हणून इंदापूर विधानसभेसाठी आपला उमेदवारी अर्ज दाखल करत इंदापूरच्या जनतेसमोर तिसरा पर्याय दिला.

उमेदवारी अर्ज दाखल करण्याआधी प्रवीण माने हर्षवर्धन पाटील आमदार दत्तात्रय भरणे यांनी इंदापूर शहरातून मोठी रॅली काढली. सर्व महामानवांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण केले.

अपक्ष उमेदवार प्रविण माने यांची रॅली भरत शहा यांच्या दुकानासमोर आल्यानंतर. श्री नारायणदास रामदास चॅरिटेबल ट्रस्टचे मुकुंद शहा, कर्मयोगी सहकारी साखर कारखान्याचे उपाध्यक्ष भरत शहा यांनी त्यांचे स्वागत केले. तसेच मुकुंद शहा यांचे वडील गोकुळदास शहा यांच्या प्रतिमेला माने यांनी अभिवादन केले. त्यावेळी शहा कुटुंबियांनी आम्ही तुमच्या पाठीशी आहोत, अशी ग्वाही दिली. मात्र आप्पासाहेब जगदाळे अनुपस्थित राहिल्याने अनेकांनी तर्क वितर्क लावले .

एकंदरीत आमदार दत्तात्रय भरणे यांच्या सभेने प्रविण भैया माने व हर्षवर्धन पाटील यांच्या सभेचे रेकॉर्ड मोडीत काढल्याची जनतेत चर्चा सुरू झाली आहे तर दोन नंबर ला प्रविण भैया माने यांच्या सभेची गर्दी ही हर्षवर्धन पाटलांच्या सभे पेक्षा दुप्पट असल्याचेही बोलले जाते.

सध्या प्रचारात प्रविण भैया माने यांच्या कार्यकर्त्यांनी जोरदार सुरुवात केली असुन येत्या काही दिवसांत प्रविण भैया माने हेच एक नंबर ला राहतील असी ही चर्चा आहे.

**४ नोहेंबर रोजी उमेदवारी माघार घेण्याची शेवटची तारीख असुन ५ नोंहेबर नंतर प्रविण माने यांच्या सोबतीला अनेक राजकीय बडे नेते प्रचारात दिसतील असे ही बोलले जात आहे. आप्पासाहेब जगदाळेंची भूमिका निर्णायक १९९५ मध्ये इंदापूर विधानसभेच्या निवडणुकीत तिरंगी लढत झाल्यानंतर तत्कालीन अपक्ष उमेदवार निवडून आला होता. तिरंगी लढत झाली तर अपक्ष उमेदवार निवडून येतो हा इंदापूर तालुक्याचा इतिहास आहे. मात्र, तिसऱ्या आघाडीतील महत्त्वाचे नेते आप्पासाहेब जगदाळे यांची भूमिका महत्त्वाची राहणार आहे. जगदाळे यांचा आमदार दत्तात्रय भरणे यांच्याशी विशेष स्नेह आहे. हर्षवर्धन पाटील हे जरी मामा असले तरी त्यांच्याशी सख्ख नाही. काही दिवसांपासून प्रवीण माने किंवा अप्पासाहेब जगदाळे हे दोघेही तिघांच्या समन्वयातून उमदेवार निश्चित करण्यात येईल, असे सांगत होते. मात्र, प्रवीण माने यांनी उमदेवारी अर्ज दाखल केल्याने जगदाळे नाराज असल्याचे बोलले जाते. त्यामुळे ते कोणाला पाठिंबा देणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.**

# विद्यार्थ्यांनी वनराई बंधारा बांधून वन्यजीवाची तहान भागविली

## वनराई बंधारा बांधून सांगितले विद्यार्थ्यांना लाख मोलाचे महत्त्व

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी/प्रतिनिधी : अर्जुनी मोरगांव तालुक्यातील खांबी येथील जिल्हा परिषद वरीष्ठ प्राथमिक शाळेमध्ये दि.२६ ऑक्टोबर ला महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार अभियानाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या मदतीने वनराई बंधारा बांधण्यात आला. 'जल ही जीवन है 'या सुविचाराप्रमाणे पर्यावरणवादी डॉक्टर मोहन धारिया यांच्या संकल्पनेतून वनराई नावाची संस्था १९८२ साली उदयास आली. सोबतच शासनाच्या पाणी आडवा पाणी जिरवा या मोहिमेतून महात्मा फुले जलसंधारण योजना व महाराष्ट्र शासनाच्या जलयुक्त शिवार अभियान यांच्या माध्यमातून पावसाचे पाणी जमिनीत कसे मुरवता येईल व त्याचा वापर भविष्यामध्ये शेती, पर्यावरण, सजीव, उद्योगधंदे यांना कसा होईल याचा विचार केला जातो. वनराई बंधारा, नाला किंवा ओढा यातील पाणी स्थानिक रित्या मिळणाऱ्या वस्तूंची जुळवणूक करून तात्पुरत्या स्वरूपात पाण्यातील तजवीज छोट्या प्रमाणात करतो त्याचे बांधकाम सिमेंटची रिकामी पोती माती वाळू दगड यांच्या साहाय्याने करता येते याला मोठ्या प्रमाणात खर्च येत नाही. हा बंधारा वनराई संवर्धनाचे काम करतो म्हणून त्यास वनराई बंधारा



असे म्हणतात

वनराई बंधारा पक्षी, जनावरे, जंगली प्राणी यांची तहान भागविण्यासाठी लाख मोलाची मदत करतो. जलसंवर्धनाच्या मोहिमेचा एक भाग म्हणून जिल्हा परिषद वरिष्ठ प्राथमिक शाळा खांबीच्या वतीने खांबी गावच्या दक्षिणेकडे एक किलो मीटर अंतरावर असलेल्या पूर्व पश्चिम वाहणाऱ्या नाल्यावर शाळेच्या मुख्याध्यापिका भद्रावती काळसर्पे मॅडम यांच्या नेतृत्वात व मार्गदर्शनात सुमारे आठ मीटर लांब व एक मीटर उंच अशा वनराई बंधाऱ्याची इयत्ता सहावी आणि सातवी च्या विद्यार्थ्यांच्या मदतीने वनराई बंधारा बांधण्यात आला. बंधार्यात साठलेल्या संरक्षित पाण्यातून रब्बी हंगामातील पिकांना व भाजीपाला यांना पाणीपुरवठा होऊन गावातील गुरेढोरे व जंगली प्राणी यांना पिण्यासाठी तसेच आसपासच्या विहिरीतील पाण्याचे पातळीत वाढ होण्यास मदत होईल. वनराई बंधारा बांधण्यात शाळा समितीचे अध्यक्ष प्रियंका खोटेले, पोलीस पाटील नेमीचंद मेश्राम यांचे मोलाचे सहकार्य लाभले. याप्रसंगी विद्यार्थ्यांना विषय शिक्षक अरविंद उके यांनी वनराई बंधारा बांधण्याची कार्यपद्धती, उपयोगिता व उपयुक्तता विद्यार्थ्यांना पटवून दिली. विद्यार्थ्यांच्या या उपक्रमाचे गावात सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे.

# सरस्वती विद्यालयात संस्थेतर्फे शाळेचे अभिनंदन



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

बोंडगांव देवी: मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा टप्पा दोन उपक्रमांतर्गत सरस्वती विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाला विभागीय स्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त झाला. त्यानिमित्त संस्थेने शाळेचे अभिनंदन करण्याकरिता अभिनंदन सोहळा आयोजित केला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष बल्लभदासची भुतडा, तर प्रमुख अतिथी केशरबाई शिक्षण संस्थेचे अध्यक्ष जयप्रकाश भैया, संस्था सचिव सर्वेश भुतडा, उपविभागीय अधिकारी वरूनकुमार सहारे,शाळेचे प्राचार्य जे.डी.पठाण,उपप्राचार्या छाया घाटे, पर्यवेक्षक महेश पालीवाल, जी. एम. बी च्या प्राचार्य शव्या जैन, संस्था सदस्य केशव भुतडा व आनंद भैय्या होते. सर्वप्रथम माता सरस्वती च्या प्रतिमेचे पूजन करून माल्यार्पण करण्यात आले. विभागीय स्तरावरुन शाळेला मिळालेले पारितोषिक व प्रमाणपत्र शाळेतर्फे संस्थेला सुपूर्द करण्यात आले.संस्थेच्या वतीने शाळेतील सर्व प्राध्यापक वृंद,शिक्षक वृंद व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. शाळेला मिळालेल्या यशात शाळेतील प्रत्येक घटकाचा समावेश आहे,शाळेतील प्रत्येक घटकांनी कठोर परिश्रम घेऊन हे यश मिळवलेले आहे त्याबद्दल मी सर्वांचे हार्दिक अभिनंदन करतो व शाळा ही अशीच प्रगतीपथावर राहील अशी मी ग्वाही देतो असे प्रतिपादन संस्था अध्यक्ष बल्लभदास भुतडा यांनी केले. शाळेने विभागातून तृतीय येऊन संपूर्ण जिल्ह्याचा गौरव वाढविला असे मनोगत वरूणकुमार शहारे यांनी व्यक्त केले. विद्यार्थ्यांची प्रगती हीच शाळेची प्रगती असे संस्थेचे कोषाध्यक्ष जयप्रकाश भैय्या यांनी आपले मत व्यक्त केले. शाळेच्या प्रत्येक कार्यात संस्था ही नेहमी शाळेच्या पाठीशी उभी राहील असे संस्थासचिव सर्वेश भुतडा यांनी आपले मत मनोगतून व्यक्त केले. सर्व मान्यवरांनी यावेळी आपले मनोगत व्यक्त केले. तालुका पत्रकार संघटनाच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन शाळेचे अभिनंदन करण्यात आले. संस्थेच्या वतीने सर्व शाळेतील घटकांना कुटुंबीयासह स्नेह भोजनासाठी आमंत्रित केले होते. कार्यक्रमाचे संचालन करून आभार सुजीत जक्कुलवार यांनी मानले.

### सोलापुरात शहरात अल्पसंख्यांक शिक्षण समन्वय परिषद

### आसिफ इक्बाल यांची पत्रकार परिषदेत माहिती

# वळसंग येथे ३ नोव्हेंबरला एशिअन मायनॉरिटी युनिव्हर्सिटीचा पायाभरणी सोहळा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : ग्लोबल एज्युकेशनल अँड हेल्थ ऑर्गनायझेशनच्यावतीने सोलापूर शहराजवळ दक्षिण सोलापूर तालुक्यातील वळसंग येथे मायनॉरिटी युनिव्हर्सिटीचा पायाभरणी सोहळा रविवार दि.३ नोव्हेंबरला सकाळी ८ वाजता आयोजित करण्यात आला आहे. या निमित्ताने सोलापूर शहरात अल्पसंख्यांक शिक्षण समन्वय परिषद होणार आहे, अशी माहिती या विद्यापीठाचे मुख्य प्रवर्तक आसिफ इकबाल यांनी पत्रकार परिषदेत दिली. मागील अनेक वर्षांपासून अल्पसंख्यांक समाजातील शिक्षणाची स्थिती दिवसेंदिवस गंभीर बनत चालली आहे. बालमजूर, शाळाबाह्य मुलांची संख्या वाढत चालली आहे. सुविधा नसल्याने उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांचे प्रमाण कमी होत चालले आहे. या सर्व समस्यांच्या पार्श्वभूमीवर अल्पसंख्यांकांच्या शैक्षणिक विकासाचा उद्देश नजरेसमोर ठेऊन एशियन मायनॉरिटी युनिव्हर्सिटीची स्थापना करण्यात येत आहे.

विद्यापीठाचा पायाभरणी समारंभ दि.३ नोव्हेंबर रोजी सकाळी ८ वाजता वळसंग येथे होईल. त्यानंतर सोलापुरातील हेरिटेज लॉन येथे सकाळी १० वाजता 'अल्पसंख्यांक शैक्षणिक समन्वय परिषद' होणार आहे.

या परिषदेच्या उद्घाटन समारंभासाठी डॉ. जहीर काझी, मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डाचे उमरैन महफूज रहमानी, माजी कुलपती जफर सरेश वाला, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु एस. एन. पठाण, सोलापूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु एन. एन. मालदार, अजमेर दर्गाह ट्रस्टचे चेअरमन सय्यद सरवर चिश्ती, समीर सिद्दीकी, मुबारक कापडी आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. ही परिषद तीन सत्रात होणार आहे. आधुनिक शिक्षण गरज व आपली जबाबदारी या विषयावर पहिल्या सत्रात अलीगड विद्यापीठाचे प्रा. सऊद आलम कास्मी, मेहमूद सिद्दीकी, खालीद सैफुद्दीन मार्गदर्शन करणार आहेत. त्यानंतर दुपारी २.३० वा. मुस्लिम शिक्षण संस्था - समस्या व उपाय या विषयावर परिसंवाद होईल. या सत्रात शाह आलम रसुल, खालीद सैफुद्दीन हे मार्गदर्शन करतील. संध्याकाळी ६ वाजता जनसभा होईल. मौलाना आझाद विद्यापीठ जोधपूरचे संस्थापक अतिक अहमद हे या जनसभेचे अध्यक्ष असतील. शिक्षणतज्ज्ञ मुबारक कापडी, समीर सिद्दीकी हे या सभेला मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी शिक्षणक्षेत्रात कार्यरत शिक्षक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन मुख्य प्रवर्तक आसिफ इकबाल यांनी केले. एड. महबूब कोथिंबीरे , जुबेर शेख, मोइज सिराज अहमद, अल्ताफ जकलेर आदी उपस्थित होते.